# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property**

**Police Station** :- **Jaulka**

**Date of Good Work done** :- **04/01/2022**

**Brief of the work done :-**

पो.स्टे.जऊलका हद्दीत दाखल दरोड्याच्या गुन्हातील आरोपीने कबुली दिल्या प्रमाणे मालेगाव येथील भंगार गोदामातून समृद्धी महामार्गावरील दीड क्विंटल स्टील व इतर साहित्य ठाणेदार आजिनाथ मोरे यांनी तपासा दरम्यान जप्त केले.

पुण्यनगरी

## भंगार व्यावसायीकाकडून 'समृद्धी'चे दीड क्विंटल स्टील व इतर साहित्य जप्त

मालेगाव, दि. ३ (प्रतिनिधी)

**तालुक्यातील जऊळका पोलीस स्टेशन हद्दीतील निर्माणाधीन समृद्धी महामार्गावरील स्टील गज व इतर लोखंडी साहित्य चोरणारी टोळी २९ डिसेंबर रोजी जऊळका पोलिसांनी ताब्यात घेतली होती. दरम्यान चोरट्यांनी सदर साहित्य मालेगाव येथील भंगार व्यावसायीक यावरखा सिकंदरखा याला विकले असल्याचे तपासात समोर आले आहे. त्यामुळे पोलिसांनी मालेगावात जाऊन गंभार गोदामातून चोरीचे दीड क्विंटल स्टील गज व इतर लोखंडी साहित्य जप्त केले आहे.**

मागील तीन ते चार वर्षापासून समृद्धी महामार्गावर डिझेल चोरी पासून तर स्टील रॉड, सिमेंट, भंगार, लोखंडी साहित्य चोरीच्या घटना सातत्याने घडत होत्या. सदर साहित्य चोरी करुन त्याची परस्पर विल्हेवाट लावली जात होती. याबाबत मालेगाव व जऊळका पोलिसांत तक्रारी झालेल्या आहेत. बहुतांश वेळा महामार्गाचे काम बघणारे कंपनीचे मॅनेजर, सुरक्षा रक्षक यांनीच चोरट्यांना पकडून दिले होते. काही चोरटे हाती लागले तरी चोरीतील मास्टरमाईंड व चोरीचा माल घेऊन त्याची विल्हेवाट लावणारा आरोपी पोलिसांच्या हाती लागत नव्हता. दरम्यान जऊळका

### जऊळका पोलिसांची मालेगावात कारवाई

पोलिसांनी २९ डिसेंबर रोजी समृद्धी महामार्गाचे साहित्य चोरणारी टोळी पकडली. या घटनेचा पुढे तपास करत असताना मालेगाव येथील भंगार व्यावसायक यावरखा सिकंदर खा याने चोरीचे साहित्य खरेदी केल्याची माहिती समोर आल्याने पोलिसांनी मालेगावात भंगार गोदामातून दीड क्विंटल स्टीलचे गज व इतर साहित्य जप्त केले असून असून चोरीचा माल खरेदी केल्याप्रकरणी भंगार व्यवसायिक यावर खा सिकंदर खा याच्याविरुद्ध कलम ३७९ नुसार गुन्हा दाखल केला आहे. समृद्धी महामार्ग लगत सुकांडा, अनसिंग यासह इतर काही गावांतील चोरट्यांचे मोठे नेटवर्क असून मालेगाव येथील भंगार व्यवसायिकाला चोरीचा माल विकला जातो, अशी चर्चा वारंवार होत होती, जऊळका पोलिसांच्या कारवाईने त्या चर्चेला पुष्टी मिळाली आहे.

जऊळका पोलिसांनी आता याप्रकरणी सखोल चौकशी करुन या चोरी प्रकरणातील आणखी काही आरोपी आणि खरे सुत्रधार यांना जेरबंद करण्याची गरज आहे.

**Smart Bhandara-Gondiya**
Page No.4 January 04, 2022